'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सॲप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू


पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026 संपर्क : मो. ९०११२०१४१४
कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई Email ID : shabdarutu@gmail.com

✻ वर्ष २ रे ✻ अंक ४८ वा ✻ रविवार दि. ३१ ऑगस्ट २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ✻ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)


### टॅरिफ वादाने भारत-चीन-रशियाला आणले जवळ

**नवी दिल्ली :** अमेरिकेने भारतावर लावलेल्या टॅरिफच्या निर्णयात चीनने भारताची साथ दिली. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सात वर्षामध्ये पहिल्यांदा चीनच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय बैठक होण्याची शक्यता आहे. नरेंद्र मोदी हे शी जिनपिंग यांच्या निमंत्रणानंतर ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या एससीओ शिखर संमेलनात भाग घेणार आहेत. या बैठकीत दोघांमध्ये टॅरिफबद्दल चर्चा होणार आहे.

**नवी कोरी पुस्तकं**




**व्हय महाराजा**
: लेखकाचे नाव :
**डॉ. महेश केळुसकर**
किंमत रु. : २४०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**




**मध्ययुगीन मराठी वाङ्मय**
: लेखकाचे नाव :
**सतीश बडवे**
किंमत रु. : ६५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

# मराठा आरक्षण घेऊनच जाणार

## मनोज जरांगेंचा मुंबईतून एल्गार : मुख्यमंत्री साहेब संधी आहे, मराठे कधीत तुम्हाला विसरणार नाहीत...

**मुंबई :** मराठा आरक्षण घेऊनच जाणार आणि त्यासाठी आमरण उपोषणाचा एल्गार करत मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदानात असंख्य मराठा आंदोलकांसह हजेरी लावली. या आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशीसुद्धा दक्षिण मुंबईत चक्काजाम झाल्याचं पाहायला मिळालं. संतप्त आंदोलकांनी सीएसटी स्थानक आणि पालिका मुख्यालयासमोर ठिय्या मांडल्याचं कळताच मनोज जरांगे यांनी आंदोलकांना शांतता राखण्याचा स्पष्ट इशारा दिला.

ओबीसींचं आरक्षण काढून आम्हाला द्या असं आम्ही म्हणत नसून आमचं आरक्षण आम्हाला द्या असं आम्ही म्हणत आहोत. कृपया संभ्रम निर्माण करु नये. ओबीसींच्या ३२ टक्के आरक्षणातून २० टक्के आरक्षण मराठ्यांना द्या असं आम्ही म्हणत नाही. मराठा, कुणबी हा एकच आहे हे समजून घ्या. राज्य अस्थिर करण्याचं काम मंत्र्यांकडून होऊ नये ही अपेक्षा आहे, असं जरांगे स्पष्ट म्हणाले.



### मराठ्यांचं पाणी बंद केल्यास आयुक्तांना सुट्टी नाही

मराठा आंदोलकांनी दक्षिण मुंबईत मोठ्या प्रमाणावर आणलेली वाहनं आणि सद्यस्थिती पाहता तुमची वाहनं पोलिसांनी दिलेल्या पार्किंगमध्ये लावा, कॉटनग्रीन, मस्जिद बंदर, शिवडीला पार्किंग आहे तिथं लावा. गाड्या सुरक्षिक ठिकाणी लावा. पाऊस आला तर तुम्हाला तुमच्या गाडीत जाऊन झोपला येईल, रेल्वेनं आझाद मैदानावर दोन मिनिटात याल. वाशीला गाड्या लावा. आपल्याला शांततेत आंदोलन करायचं आहे. समजून घ्या गोंधळ घालणाऱ्यांना घालूदेत, पण त्यांना सांगा की तुम्ही आंदोलनाची दिशा सध्या शांततेत ठेवा. बघू ना किती दिवस चालणार हे, आरक्षण देतात की नाही, त्यांची (सरकारची) काय इच्छा आहे बघू..., असं ते म्हणाले.

आंदोलकांना सुविधा देणं हे प्रशासनाचं काम आहे. आयुक्तांचं काम आहे ना... पोरं वैतागलीयेत. बीएमसी आणि सीएसटीसमोरील पोरांना विनंती आहे शांततेनं घ्या, अशा शब्दांत जरांगेंनी आंदोलकांना आवाहन केलं. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधल्याचंही पाहायला मिळालं.

पोरांना विनंती आहे, होऊ दे हाल... तुम्ही आझाद मैदानात या. पोलिसांना विनंती पोरांना डिवचू नका. तुम्ही हॉटेल बंद करायला लावले, म्हणून पोरं वैतागली. भाजपमधील **(पान २ वर)**



### हैदराबाद गॅझेट लागू करण्यास तत्वतः मंजुरी

माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांनी मनोज जरांगे यांची आंदोलस्थळी जावून भेट सांगितलं की ''राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्यास तत्वतः मंजुरी दिली आहे.'' त्यावरील मनोज जरांगे यांच्या सूचना घेऊन शिंदे समितीचे सदस्य आता मंत्रिमंडळ उपसमितीची भेट घेणार आहे. प्रसार माध्यमांशी बोलतांना न्या. शिंदे यांनी सांगितले की, मनोज जरांचे यांचे समाधान झाले आहे, त्यांनी दिलेल्या सूचना आम्ही उपसमितीसमोर मांडणार आहोत.

### शिंदेंच्या दरेगाव दौऱ्यामुळे चर्चांना उधाण

मात्र याचवेळी मुंबईत मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आझाद मैदानात आमरण उपोषणाला बसलेले आहेत. राज्यभरातून मराठा समाज मुंबईत येत असून आंदोलन अधिक तीव्र होत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारकडून अद्याप कोणतेही अधिकृत प्रतिनिधी किंवा शिष्टमंडळ जरांगे पाटील यांना भेटण्यासाठी गेलेले नाही, त्यातच एकनाथ शिंदे गणपती दर्शनासाठी दरे गावात जाणार असल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

### शाह यांची तावडे यांच्यासोबत चर्चा

मुंबई दौऱ्यावर असलेल्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यासोबत चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीत राज्यातील मराठा आरक्षणाचा मुद्दा, बिहार विधानसभा निवडणुका आणि उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसंदर्भात चर्चा झाल्याचं बोललं जात आहे. विशेषतः मुंबईत सुरू असलेल्या मराठा आंदोलनाची माहिती अमित शहा यांनी विनोद तावडे यांच्याकडून घेतल्याचीही माहिती मिळत आहे. या चर्चेतून आंदोलनावर काही ठोस तोडगा निघाला का? आणि सरकारची पुढील भूमिका काय असेल? हे पाहणे आता महत्वाचे ठरणार आहे.

## संक्षिप्त

### 'राज' की बात राजही रहने दो...

**मुंबई ।** मुंबईतील गणेशोत्सव देशात चर्चेत असतो, विशेष म्हणजे येथील राजकीय नेत्यांच्या घरातील गणपती बाप्पांचे दर्शन घेण्याची वेगळीच परंपरा आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या घरीही गणेशोत्सवाच्या निमित्ताने मुख्यमंत्र्यांपासून ते बड्या राजकीय नेत्यांनी गाठीभेटी दिल्या. त्यामध्ये, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही भेट देत राज ठाकरेंच्या घरातील गणरायाचे दर्शन घेतले. या राजभेटीनंतर त्यांनी मिश्कील आणि तितकीच सूचक राजकीय प्रतिक्रिया दिली. यावेळी पत्रकारांनी प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले, 'राज' की बात है राजही रहने दो.

# निर्यात प्रोत्साहनासाठी २५००० कोटी

## भारतीय वस्तूंना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारची योजना

**नवी दिल्ली :** जगभरातील देशांमध्ये भारतीय उत्पादने पोहोचवण्यासाठी सरकार एक नवीन योजनाआखत आहे. अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या निर्यात प्रोत्साहन मोहिमेअंतर्गत केंद्र सरकार २०२५ ते २०३१ पर्यंत निर्यातदारांना सुमारे २५००० कोटी रुपयांची मदत देण्याची योजना विचारात घेत आहे. या योजनेनुसार, वेगवेगळ्या कामांसाठी वेगवेगळ्या रकमा खर्च केल्या जाणार आहेत. या मोहिमेचे उद्दिष्ट पुढील ६ वर्षांत मोठ्या प्रमाणात, समावेशक आणि शाश्वत निर्यात वाढीला चालना देणे आहे.

या मदतीचा मुख्य उद्देश निर्यातदारांना स्वस्त आणि सुलभ कर्जे देणे आहे. वाणिज्य मंत्रालयाने हा प्रस्ताव अर्थ मंत्रालयाच्या खर्च वित्त समितीकडे पाठवला आहे. जर तो मंजूर झाला तर तो भारतीय निर्यातदारांना विशेषतः अमेरिकेच्या करांमुळे निर्माण झालेल्या **(पान २ वर)**

# मराठा समाजासाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई :** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी कालपासून (२९ ऑगस्ट) मुंबईतील आझाद मैदानात उपोषण सुरु केलं आहे. मनोज जरांगेंच्या आंदोलनाचा आज दुसरा दिवस आहे. मराठा आरक्षणासाठी सरकारशी लढा सुरू आहे. मनोज जरांगेंसह लाखो मराठा आंदोलक मुंबईत दाखल झाले आहेत. याचदरम्यान महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.




राज्यातील मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तालुकास्तरावर तहसिलदारांच्या ध्यक्षतेखाली गठीत वंशावळ समितीस शासनाने ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केला असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली आहे. एकीकडे मराठा समाजाचं आंदोलन सुरु असताना राज्य सरकारने मराठा समाजासाठी गठीत वंशावळ समितीस ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या २५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ही समिति गठीत करण्यात आली होती. या समितीच्या **(पान २ वर)**



# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी योग्य वेळी निर्णय घेऊ : पवार


**श्रीगोंदा :** राज्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारकडून कर्जमाफी व्हावी यासाठी समिती गठीत करण्यात आली असून त्याचा अहवाल आल्यावर योग्य वेळी कर्जमाफीचा निर्णय घेण्यात येईल. तसेच समाज्यात जातीय तेढ निर्माण करून कोणताही विकास होत नाही असा टोलाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्रीगोंद्यात लगावला आहे.

श्रीगोंदा शहरातील संत शेख महंमद महाराज प्रांगणात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख **(पान २ वर)**

# अमेरिकेने लावलेल्या टॅरिमुळे दोन्ही देशांच्या व्यापार संबंधांवर ताण

## रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ २७ ऑगस्टपासून लागू

**नवी दिल्ली :** ट्रम्प प्रशासनाने भारतावर ५० टक्के शुल्क लादले आहे, जे २७ ऑगस्टपासून लागू झाले आहे. ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्हच्या अहवालानुसार, या नवीन शुल्कामुळे भारताच्या सुमारे ५.४ लाख कोटी रुपयांच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो. ५० टक्के शुल्कामुळे अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या कपडे, रत्ने-दागिने, फर्निचर, सीफूड यासारख्या भारतीय उत्पादनांना महागडे बनवले जाईल. यामुळे त्यांची मागणी ७० टक्के कमी होऊ शकते.




चीन, व्हिएतनाम आणि मेक्सिको सारखे कमी शुल्क असलेले देश या वस्तू स्वस्त दरात विकतील. यामुळे अमेरिकन बाजारपेठेतील भारतीय कंपन्यांचा वाटा कमी होईल.

अमेरिकेने भारतावर ५० टक्के टॅरिफ लावल्यामुळे दोन्ही देशांच्या व्यापार संबंधांवर मोठा ताण आला आहे. या निर्णयामुळे भारताच्या निर्यातदारांना मोठा फटका बसू शकतो आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

### रशियन तेल खरेदीमुळे लावला कर

ट्रम्प यांनी रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल दंड म्हणून ६ ऑगस्ट रोजी हा कर जाहीर केला. त्याच वेळी, व्यापार तूट उद्धृत करून ७ ऑगस्टपासून भारतावर २५ टक्के कर लादण्यात आला. चीननंतर भारत हा रशियन तेलाचा सर्वात मोठा खरेदीदार आहे. युक्रेन युद्धापूर्वी, भारत रशियाकडून फक्त ०.२ टक्के (प्रतिदिन ६८ हजार बॅरल) तेल आयात करत असे. मे २०२३ पर्यंत, ते ४५ टक्के (प्रतिदिन २० लाख बॅरल) पर्यंत वाढले, तर २०२५ मध्ये जानेवारी ते जुलै या कालावधीत, भारत रशियाकडून दररोज १७.८ लाख बॅरल तेल खरेदी करत आहे. गेल्या दोन वर्षांपासून, भारत दरवर्षी १३० अब्ज डॉलर्स (११.३३ लाख कोटी रुपये) पेक्षा जास्त किमतीचे रशियन तेल खरेदी करत आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयावर भारताने प्रतिक्रिया दिली आहे. **(पान २ वर)**

# 'ट्रम्प टॅरिफ' अमेरिकन न्यायालयाने ठरविले बेकायदेशीर

ट्रम्प यांनी आपत्कालीन अधिकारांचा वापर करून टॅरिफ लादले, जे करण्याचा त्यांना कायदेशीर अधिकार नव्हता. ट्रम्प यांना प्रत्येक आयातीवर टॅरिफ लादण्याचा अमर्याद अधिकार नाही, असे अमेरिकन अपील कोर्टानं म्हटलं आहे. तथापि, कोर्टाने ऑक्टोबरपर्यंत हा निर्णय लागू करण्यापासून रोखले आहे, जेणेकरून ट्रम्प सर्वोच्च न्यायालयात अपील करू शकतील. ट्रम्प यांनी या निर्णयावर जोरदार टीका केली आणि म्हटले की जर हे टॅरिफ काढून टाकले तर अमेरिका उद्ध्वस्त होईल.

कोर्टाने म्हटले आहे की ट्रम्प १९७४ च्या व्यापार कायद्याअंतर्गत १५० दिवसांसाठी १५ टक्के टॅरिफ लादू शकतात, परंतु यासाठी एक ठोस कारण असले पाहिजे. ट्रम्प यांनी व्यापार तूट आणि इतर कारणांमुळे चीन, कॅनडा, मेक्सिको सारख्या देशांवर टॅरिफ लादू होते. यानंतर, लहान व्यापाऱ्यांनी आणि काही राज्यांनी या शुल्कांबद्दल तक्रार केली, कारण त्यामुळे त्यांचा खर्च वाढत होता. ट्रम्प यांनी २०१७ च्या आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक शक्ती कायद्याअंतर्गत राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केली आणि बहुतेक देशांवर १० ते ५० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लादले. त्यांनी असा युक्तिवाद केला की अमेरिकेची व्यापार तूट ही राष्ट्रीय आणीबाणी आहे.

# संगमनेरची जनता आता दुटप्पी भूमिका सहन करणार नाही : मंत्री विखे

## बाळासाहेब थोरात यांच्यावर टीका, आ. खताळांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ मोर्चा



**संगमनेर :** एकीकडे आम्ही संगमनेर तालुका दहशतमुक्त करू असे सांगायचे आणि दुसरीकडे तुम्हीच दहशत करून असे हल्ले घडून आणायचे. अशी दुटप्पी भूमिका आता संगमनेर तालुका सहन करणार नाही.

तुमच्या धाकदडपशाहीमुळे जनतेने तुम्हाला पराभूत केले आहे. पण आता आमदार अमोल खताळ यांच्यावर हल्ला करून तुम्ही जनतेच्या मनातून उतरला आहात, अशी टीका राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बाळासाहेब थोरात यांचे नाव न घेता केली आ. खताळ यांच्यावर झालेल्याहल्याच्या निषेधार्थ महायुतीच्यावतीने प्रांताधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. मोर्चे करांच्यावतीने प्रांताधिकारी अरुण उंडे यांना निवेदन देण्यात आले. त्यानंतर निषेध सभेत बोलताना मंत्री विखे म्हणाले की, संगमनेर तालुक्यातील मतदार आता जागा झाला आहे. त्यामुळे तुमच्या पायाखालची जमीन सरकली आहे. खताळ यांचा जनाधार दिवसेंदिवस वाढत असून, अशा भ्याड हल्ल्याने ते घाबरणारे नाहीत.

एक इंचही मागे हटणार नाही : आ. खताळ

आमदार अखताळ म्हणाले की, माझ्यावरील हल्ला करण्याचा प्रकार अत्यंत दुर्दवी आहे. काहीजण जनतेमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करून जनतेला आपल्या जवळ घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. परंतु जनता आता त्यांना कुठल्याही प्रकारचा थारा देणार नाही. लोकशाहीने केलेला पराभव त्यांना मान्य नसून त्यांना तो पचवता येत नाही. त्यामुळे ते असे हल्ले माझ्यावर करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांनी कितीही हल्ले करू द्या मी एक इंच ही मागे हटणार नाही. माझ्या जीवातजीव आहे तोपर्यंत मी तुम्हाला कधीच विसरणार नाही. गणेशोत्सवामुळे थांबलो. माझ्या कार्यकर्त्यांना हात लावला तर पहिली गाठ माझ्याशी आहे, असा इशारा त्यांनी दिला. नेवासेचे आमदार विठ्ठलराव लंघे म्हणाले की, राजकीय द्वेषापोटी आ. खताळ यांच्यावर हल्ला केला आहे. तालुक्यातील ४० वर्षाचे रखडलेले प्रश्न सोडविण्याचे काम आ. खताळ करत आहे आणि त्या प्रश्नाची सोडवणूक विधानसभेत ते पोटतिडकीने करत आहे. ही पोटदुखी काहींना सहन होत नाही. संपूर्ण सरकार आमदार खताळ यांच्या मागे भक्कम उभे असल्याचे आमदार लंघे यांनी सांगितले यावेळी महायुतीच्या वतीने भाजपचे माजी शहराध्यक्ष श्रीराम गणपुले, शिवसेनेचे माजी शहरप्रमुख आप्पासाहेब केसकर, माजी नगरसेवक अविनाश थोरात शौकत जागीरदार, शिवसेनेचे जिल्हा संघटक विठ्ठल घोरपडे, तालुकाध्यक्ष रामभाऊ राहाणे, शहराध्यक्ष दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, भाजपचे तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, श्रीकांत गोमासे, शहराध्यक्ष पायल ताजणे, आरपी आयचे तालुकाध्यक्ष आशिष शेळके शहराध्यक्ष कैलास कासार, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रवीण कानवडे यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या.


जशास तसे उत्तर देऊ

घटना घडल्यानंतर अवघ्या काही मिनिटांमध्येच हल्लेखोराचे समाजमाध्यमाचे सर्व अकाउंट बंद कसे होतात, असा सवाल उपस्थित करून मंत्री विखे म्हणाले की, या सर्व प्रकरणाची पोलीस अधिकाऱ्यांनी पारदर्शकपणे सखोल करावी. या तालुक्यात हल्ले करण्याची परंपरा ही जुनीच आहे. धांदरफळ घटना असेल किंवा तालुक्यात घडलेल्या अजूनही काही घटनांमुळे खरी दहशत कोण निर्माण करत आहे, हे आता जनतेला समजले आहे. महायुती सरकार मात्र अमोल खताळ यांच्या माध्यमातून तालुक्यात विकासाची प्रक्रिया पुढे घेऊन जात आहे. ४० वर्षात तालुक्याला निळवंडे धरणाचे पाणी मिळू शकले नाही. ते आज युती सरकारमुळे मिळाले आहे. यापुढे असे हल्ले झाल्यास आम्ही जशास तसे उत्तर देऊस, असे मंत्री विखे यांनी स्पष्ट केले.

# १२ जिल्ह्यांना अलर्ट; महाराष्ट्रात भयानक पाऊस

### २४ तासांत ६ जणांचा मृत्यू; अनेक रस्ते बंद

**मुंबई :** मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवतानाच, हवामान खात्याने मुंबईसह महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. महाराष्ट्रात भयानक पाऊस पडत आहे. २४ तासांत ६ जणांचा मृत्यू झाला आहे.



विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाने हाहाकार माजवला आहे. नांदेड आणि लातूर जिल्ह्यात परिस्थिती सर्वात जास्त बिकट झाली आहे. हवामान खात्याने मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली तसेच पुणे, कोल्हापूर आणि सातारा या घाट भागात २४ तासांचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

महाराष्ट्र सरकारने २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, गेल्या २४ तासांत राज्यात पावसामुळे ६ जणांचा मृत्यू झाला आहे. चंद्रपूर, नांदेड, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्ह्यातून प्रत्येकी एका मृत्यूची नोंद झाली आहे. याशिवाय ५ जण जखमी झाले आहेत. तर, ४२ गुरेही मृत्युमुखी पडली आहेत. लातूर जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे सामान्य जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे, त्यामुळे प्रशासनाने शुक्रवारी जिल्ह्यातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. मुसळधार पावसामुळे राज्यातील मराठवाडा भागात असलेल्या लातूर जिल्ह्यातील ६० पैकी २९ महसूल मंडळांमध्ये नद्या आणि नाल्यांमध्ये पाण्याची पातळी वाढली आहे, त्यामुळे सखल भागात पाणी साचल्याने मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे. जवळपास ५० रस्ते आणि पूल पाण्यावरून वाहू लागल्याने बंद करण्यात आले आहेत. राज्य महामार्ग क्रमांक २३८ वरील निलंगा-उदगीर-धनेगाव रस्ता पाणी साचल्यामुळे बंद करण्यात आला आहे. मांजरा नदीवरील पूल बुडाल्याने निलंगा-उदगीर रस्ताही बंद आहे. तगरखेडा ते औराद यांना जोडणारे दोन रस्तेही पाण्यामुळे बंद झाले आहेत. निलंगा तालुक्यातील शेलगी गावात गुरुवारी मध्यरात्री वीज कोसळून पाच गुरांचा मृत्यू झाला. दुसरीकडे, गुरुवारी संध्याकाळी चाकूर तहसीलमधील बीएसएफ कॅम्प परिसरात असलेल्या केंद्रीय विद्यालयात पाणी साचल्यामुळे अडकलेल्या ६७९ विद्यार्थ्यांना आणि ४० शिक्षकांना बीएसएफ जवानांनी सुरक्षितपणे बाहेर काढले.

# ६८० शिक्षकांना अटक होणार!

**पुणे :** बोगस शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. सायबर पोलिसांकडून आतापर्यंत तपासलेल्या १ हजार ८० आयडीमधून ६८० शिक्षकांचे आयडी बोगस असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे या शिक्षकांना अटक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या ६८० बोगस शिक्षकांवर अटकेची टांगती तलवार आहे. या सर्वांना पोलिसांकडून अटक करण्यात येणार असल्याचे संकेत एसआयटीकडून मिळाले आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्तुळात खळबळ उडाली. नागपूर विभागातील शालार्थ आयडी घोटाळ्याने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली. ५ महिन्यांपूर्वी हे प्रकरण उघडकीस आले. या प्रकरणाचा सध्या पोलिसांकडून तपास सुरू आहेत. उपसंचालक उल्हास नरड यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीने विभागातील २३३ शिक्षकांचे शालार्थ आयडी बनावट असल्याचा अहवाल सादर केला होता. त्या आधारेच सायबर पोलिसांकडे तक्रार देण्यात आली होती. १२ मार्चला सायबर पोलिसांकडे या प्रकरणात पहिल्यांदा गुन्हा दाखल झाला. सायबर पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू असताना एक एकाची नावं समोर येऊ लागली. सायबर पोलिसांनी केलेल्या तपासातून नागपूर विभागातील एकूण शिक्षकांपैकी बोगस शालार्थ आयडी घोटाळा १ हजार ८० शिक्षकांचे आयडी बोगस असल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर शिक्षण विभागाकडून या सर्व शिक्षकांची चौकशी सुरू करण्यात आली. शालार्थ घोटाळ्यातील मुख्य आरोपी निलेश वाघमारेला पोलिसांनी अटक केली.

पान १ वरून

### मराठा आरक्षण घेऊनच जाणार

काम करणाऱ्या मराठ्यानं समजून घ्यावं की तुमचे मुख्यमंत्री गोरगरिब मराठ्याच्या पोरांना किती त्रास देतायत. हॉटेलं, शौचालयं बंद करायला सांगितलं. मुख्यमंत्रीसाहेब हा गैरसमज दूर करा. एकच विनंती, मराठ्यांना आरक्षण द्या, मराठ्यांचा शब्द मान्य करा. मराठे तुम्हाला कधी विसरणार नाहीत. ही तुमच्यासाठी मोठी संधी आहे. तुमच्यामुळं अमित शाह आणि मोदीसाहेबांनाही अडचण येईल, असा सूचक इशारा जरांगेंनी दिला.

आम्ही शांततेच्या मार्गानं जाणार असं सांगताना त्यांनी वारंवार आक्रमक आंदोलकांना आझाद मैदानाकडे येत सीएसटीचा मार्ग मोकळा करण्याचं आणि मुंबई मोकळी करण्याचं आवाहन केलं. मुंबई आपली आहे. आपल्याला मुंबई सांभाळायची आहे. रोडवर लावलेल्या गाड्या मैदानात लावा, गैरसमज करू नका, असं सांगत जरांगेंनी आपण आरक्षण अंमलबजावणीशिवाय माघार घेणार नाही असा निर्धारही करत पोलिसांनाही सहकार्याची विनंती केली.

कार्यकर्त्यांना त्यांनी तातडीनं आझाद मैदानातून सीएसएमटीच्या दिशेनं जाण्यास सांगत तेथील आंदोलकांना आझाद मैदानावर पाठवा अशा सूचना केल्या. मी शेवटचं सांगतो पोरांना गोरगरिब मुंबईकरांना त्रास होता कामा नये. जे जे उड्डाणपूलावर गाड्या असतील तर त्या काढा आणि मैदानावर लावा. पोलिसांनी कृपया सहकार्य करावं. मी कोणाच्या आश्वासनावर उपोषण मागे घेणार नाही. राज्य अस्थिर होता कामा नये, अशा शब्दांत त्यांनी आपली भूमिका मांडली.

### निर्यात प्रोत्साहनासाठी २५००० कोटी

जागतिकव्यापाराच्याअनिश्चिततेपासून स्वतःचे संरक्षण करण्यास मदत करेल. ईएफसीकडून मंजी मिळाल्यानंतर, वाणिज्य मंत्रालय केंद्रीय मंत्रिमंडळाकडून मंजुरी घेईल. या मोहिमेचे उद्दिष्ट पुढील ६ वर्षांत (आर्थिक वर्ष २०२५- २०३१) मोठ्या प्रमाणात, समावेशक आणि शाश्वत निर्यात वाढीला चालना देणे आहे. याअंतर्गत, पारंपारिक पद्धतींच्या पलीकडे जाऊन एमएसएमई (सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग) ज्या प्रमुख समस्यांना तोंड देतात त्यावर उपाय शोधले जातील. सूत्रांनी सांगितले की, दोन उप-योजनांद्वारे हे अभियान राबविण्याची योजना आहे.

निर्यात प्रोत्साहन योजनेअंतर्गत सरकार ज्या गोष्टींचा विचार करत आहे, त्यामध्ये पुढील ६ वर्षांसाठी ५००० कोटी रुपयांपेक्षा जास्त व्याज अनुदान समर्थन समाविष्ट आहे. याशिवाय, पर्यायी व्यापार वित्त पर्यायांना प्रोत्साहन देणे, ई-कॉमर्स निर्यातदारांसाठी क्रेडिट कार्ड प्रदान करणे आणि रोख प्रवाहाच्या कमतरतेवर मात करण्यासाठी इतर आर्थिक व्यवस्था करणे यांचा समावेश आहे. निर्यात दिशा योजनेअंतर्गत प्रस्तावांमध्ये निर्यात गुणवत्ता मानकांचे पालन करण्यासाठी समर्थन सुमारे ४००० कोटी रुपये खर्च करण्यात येतील, परदेशी बाजारपेठ विकासासाठी ४००० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च तसेच निर्यातीसाठी ब्रेडिंग, गोदाम आणि लॉजिस्टिक्स आणि जागतिक मूल्य साखळीत अधिकाधिक भारतीय उद्योगांना एकत्रित करण्यासाठी क्षमता निर्माण यांचा समावेश आहे. यामध्यमातून निर्यातदारांना स्वस्त आणि सुलभकर्जे देण्यात येणार आहेत.

### मराठा समाजासाठी राज्य

### सरकारचा मोठा निर्णय

कार्यकाळाला यापूर्वी ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर, मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आला होता. यास अनुसरून तालुकास्तरीय वंशावळ समितीस उच्चस्तरीय समितीच्या मुदतवाढीपेक्षा किमान सहा महिने अधिक मुदत देण्याचा विचार शासनाकडून करण्यात आला होता. त्यानुसार, आता या समितीचा कार्यकाळ ३० जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे. सदर समितीस २५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व तरतूदी लागू राहतील, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

### शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी योग्य वेळी निर्णय घेऊ : पवार

उपस्थितीमध्ये शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगर तालुक्याचे आमदार संग्राम जगताप हे होते त्यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले कि, आगामी काळात येणा-या महानगरपालिका, नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका लढविण्यासाठी अंतर्गत धुसफूस मागील झाले गेले विसरून कामाला लागा सर्वांचे एकत्रित पेक्षा कमी मताधिक्य असतानाही तालुक्याचा आमदार विक्रम पाचपुते झाला त्यामुळे एकोपा महत्वाचा आहे असेही त्यांनी सांगत तालुक्यातील नेतुयांचे कान टोचले आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना मोफत वीज शेतकरी सन्मान योजना, लाडकी बहीण योजना, रस्ते वीज पाणी सरकारी कर्मचारी पगार पेन्शन, मुलीचे शिक्षण यासह अनेक योजनांमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर मोठा ताण आहे. शेतकऱ्यांसाठी ३ लाखांपर्यंतचे कर्ज बिनव्याजी देत असून जे व्याज मुद्दल वेळेवर भरतात त्यांचाही थकबाकीदार असलेल्या शेतकऱ्यांबरोबर कर्जमाफी करण्याचा विचार आहे यासाठी राज्य सरकारने एक समिती गठीत केली असून त्याचा अहवाल येताच योग्य वेळी कर्जमाफीचा निर्णय घेण्यात येईल तसेच शेतकऱ्यांनी एआय नावाचे विकसित तंत्रज्ञान वापरण्याची गरज निर्माण झाली आहे त्यामधून पाणी खते औषधे वाचवून उत्पन्न बात होते त्यासाठी सरकारने अर्थसंकल्पात

५०० कोटीची तरतूद केली आहे. आता सहकार आणि खाजगी साखर कारखानदारी मध्ये मोठ्या प्रमाणात स्पर्धा सुरु झाली आहे यासाठी सहकारी साखर कारखानदारी वाचविण्यासाठी एनसीडीसी मार्फत कर्जपुरवठा केला जाईल कर्जाची परतफेड करण्यासाठी संचालक याच्या मालमत्ता तारण म्हणून घेतल्या जातील तरच कर्जपुरवठा केला जाईल पुणे पिंपरी चिंचवड शहराला सुमारे ३४ टीएमसी पाणी पिण्यासाठी लागते त्यामुळे टाटा वीज कंपनीशी बोलणी चालू असून लवकरच हे पाणी पिण्यासाठी उपयोगात येईल. घोड कुकडी विसापूर लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणी नियमित मिळण्यासाठी कालवा दुरुस्थीच्या कामाला गती दिली आहे तर लवकरच साकळाई उपसा सिंचन योजनेचा प्रश्न मार्गी लागेल तर डिंभे माणिकडोह बोगदा याबाबतही बसून समनव्य साधत मार्ग काढावा लागेल तर श्रीगोंद्यात हजारो कोटी रुपयांच्या घोटाळ्याबाबत बोलताना ते म्हणाले कि जादा परताव्याच्या हव्यासापोटी सिस पे इन्फिनिटी बिकॉन, ग्लोबल ट्रेडिंग कंपनी यामध्ये ज्यांनी पैसे गुंतवले त्यांची फसवणूक झाली आहे, याबाबत अहिल्यानगर पोलीस अधीक्षक याच्याशी बोलून मालमत्ता जप्त करून वसुलीबाबत निर्णय घेऊ तर श्रीगोंदा शहराचे आराध्य दैवत संत शेख महंमद महाराज याच्या जीर्णोद्धारासाठी सर्वानी एकत्र बसून मार्ग काढा निधी आम्ही देऊ तुम्ही ७ जण एकोप्याने रहा आणि आगामी निवडणुका राष्ट्रवादी पक्ष पूर्ण ताकतीने लढवा असेही त्यांनी सांगितले

यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक घनश्याम शेलार यांनी केले माजी आ. राहुल जगताप, राजेंद्र नागवडे, अण्णासाहेब शेलार यांची भाषणे झाली अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये आमदार काशिनाथ दाते, शिवाजी गर्जे, संध्या सोनवणे, अर्चना पानसरे, लहू कानडे, रमेश थोरात, अशोक सावंत, अरुण तनपुरे, चंद्रशेखर घुले, सचिन जगताप, बाळासाहेब नाहाटा दत्तात्रय पानसरे, भगवान पाचपुते, काशिनाथ दाते आदी मान्यवर उपस्थित होते.

### अमेरिकेने लावलेल्या टॅरिमुळे दोन्ही देशांच्या व्यापार संबंधांवर ताण

जगभरातील तज्ज्ञही अमेरिकेच्या या निर्णयाचं विश्लेषण करत आहेत. या पार्श्वभूमीवर भारताचं पुढचं पाऊल आणि जागतिक व्यापारातील बदल याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

अमेरिका रशियावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु, भारत या राजकीय डावपेचात अनपेक्षितपणे मुख्य निशाण्यावर आला आहे.

बुधवारी (६ जुलै) अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताविरोधातील टॅरिफ २५ टक्क्यांवरून ५० टक्केपर्यंत वाढवलं. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्यामुळे अमेरिका नाराज आहे. भारताने अमेरिकेच्या या निर्णयाचं वर्णन अयोग्य आणि अतार्किक असं केलं आहे.

या टॅरिफचा मुख्य उद्देश हा रशियाच्या तेल विक्रीतून होणारी कमाई कमी करणं आणि पुतिन यांना युक्रेनसोबत युद्ध थांबवायला भाग पाडणं हा आहे.

भारतावर अमेरिकेचं हे नवीन टॅरिफ २७ ऑगस्टपासून लागू होणार आहे. यामुळे भारत आशियामध्ये अमेरिकेला सर्वाधिक टॅरिफ देणारा व्यापारी भागीदार बनेल. या बाबतीत भारत ब्राझीलच्या रांगेत जाऊन बसला आहे.

ब्राझील आधीपासूनच अमेरिकेसोबतच्या तणावपूर्ण संबंधांमुळे मोठ्या टॅरिफचा सामना करत आहे.

**भारतासाठी कठीण काळ**

रशियाकडून तेल घेणं देशाच्या ऊर्जा सुरक्षिततेसाठी गरजेचं असल्याचं भारताचं म्हणणं आहे. परंतु, अमेरिकेच्या टॅरिफमुळे भारताच्या निर्यातीवर आणि आर्थिक प्रगतीवर मोठा परिणाम होऊ शकतो. भारत दरवर्षी अमेरिकेला ८६.५ अब्ज डॉलर (सुमारे ७.२ लाख कोटी रुपये) इतक्या वस्तूंची निर्यात करतो. जर हा टॅरिफ कायम राहिला, तर निर्यातीवर मोठा ताण येऊ शकतो. बहुतांश भारतीय निर्यातदारांनी ते केवळ १० ते १५ टक्के टॅरिफ सहन करू शकतात असं म्हटलं आहे. ५० टक्के टॅरिफ सहन करण्याची त्यांची क्षमता नाही. जपानी ब्रोकरेज कंपनी नोमुराने एका निवेदनामध्ये म्हटलं, ''जर हा टॅरिफ दर लागू झाला, तर तो व्यापार बंदीसारखा मोठा परिणाम करू शकतो. टॅरिफमुळे जी उत्पादनं प्रभावित होतील, त्यांची निर्यात अचानक थांबू शकते.'' अमेरिका ही भारताची सर्वात मोठी निर्यात बाजारपेठ आहे. भारत आपला १८ टक्के माल अमेरिकन बाजारपेठेत निर्यात करतो. ही निर्यात भारताच्या एकूण आर्थिक उत्पादनाच्या (जीडीपी) २.२ टक्के आहे. ५० टक्के टॅरिफमुळे भारताच्या जीडीपीमध्ये ०.२ ते ०.४ टक्के घट होऊ शकते. यामुळे या वर्षी आर्थिक विकास दर ६ टक्क्यांच्या खाली जाऊ शकतो.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |

**नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक**

| | | |
|---|---|---|
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |

**चरित्र/आत्मचरित्र**

| | | |
|---|---|---|
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |

**कविता संग्रह**

| | | |
|---|---|---|
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |

**चरित्र**

| | | |
|---|---|---|
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

**सामान्यज्ञान**

| | | |
|---|---|---|
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |

**शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी**

| | | |
|---|---|---|
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

**कृषि विषयक पुस्तके**

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**

| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा –**
**मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**


CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Vision India

- Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
- State-of-the-Art eBook Readers
- Advanced Security and Technology
- Intelligent Search and Realistic Viewing Experience
- Expansive Content Library
- Global Accessibility and Multi-Publisher Platform
- Tailored Solutions for Institutes and Libraries
- Interactive Learning with General Knowledge Software
- Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 I +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# गुटखा बनविण्यासाठी लागणारा ८ कोटी ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त



### जप्तीचा तपशील

* लाल सुपारी : ९५० किलो (२ लाख ५ हजार) किंमत ६ कोटी १७ लाख ८५ हजार रुपये
* तंबाखू - ८०० किलो (७ हजार किलो) किंमत १५ लाख ६० हजार रुपये
* वाहने : १३ (किंमत २ कोटी १० लाख रुपये)

**एकूण ८ कोटी ४३ लाख ४५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यात अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी सुरू केलेल्या मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगरच्या पथकाने राहुरी तालुक्यातील चिचोली शिवारात मोठी कारवाई करत तब्बल ८ कोटी ४३ लाख ४५ हजार रुपये किमतीचा गुटखा बनविण्यासाठी लागणारा मुद्देमाल जप्त केला. यात २लाख ५हजार, १५० किलो लाल सुपारी, ७हजार ८०० किलो तंबाखू व १३ वाहने असा प्रचंड साठा असून, या कारवाईमुळे गुटखा माफियांच्या मुसक्या आवळल्या गेल्या आहेत. २७ ऑगस्ट रोजी पथकाला गुम माहिती मिळाली की कर्नाटकातून अवैधरीत्या आणलेली सडलेली लाल सुपारी व तंबाखू गुजरात राज्यात गुटखा निर्मितीसाठी नेण्यात वैणार आहे. त्यानुसार बिचोली शिवारात स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई केली आहे.

हॉटेल महालक्ष्मी, चौधरी पॅलेस परिसरात सापळा रचण्यात आला. तेथे आलेल्या १३ ट्रुकांची तपासणी केली असता १० ट्रुकांमध्ये प्रचंड प्रमाणावर लाल सुपारी व तंबाखू आढळले. वाहनचालकांकडे वाहतुकीसाठी आवश्यक परवाना वा ई-ये बिल नव्हते. उलट, सादर केलेली बिल्टी संगणकीय नसून हस्तलिखित व बनावट असल्याचे स्पष्ट झाले. या कारवाईत हरियाणा, राजस्थान व महाराष्ट्रातील काही ट्रकचालकांना अटक करण्यात आली. त्यानी दिलेल्या कबुलीजबाबात हा साठा कर्नाटकातून आणला असल्याचे आणि गुजरातमध्ये गुटखा निर्मितीसाठी पोचवण्याचे कबूल केले जप्त केलेल्या सुपारी व तंबाखूचा तपास करून पुढील कारवाईसाठी वस्तू व सेवा कर विभाग, अहिल्यानगर यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचनांनुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली असून, या धडाकेबाज कारवाईमुळे कर चुकवून गुटखा माफियांचा मोठा डाव उधळला आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर धडक कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पो. उपनि. राजेंद्र वाघ, अंमलदार रमेश गांगडे, गणेश लबडे, राहुल द्वारके, लक्ष्मण खोकले, भिमराज खसे, रिचर्ड गायकवाड, राहुल डोके, सतिष भवर, सुनिल मालणकर, महादेव भांड, उमाकांत गावडे या पथकाने ही धडाकेबाज कारवाई केली.

## भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था : मोदी

**टोकियो :** भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे. देशातील राजकीय व आर्थिक स्थैर्य, धोरणांतील पारदर्शकतेमुळे तो विविध क्षेत्रांत विशेषतः हरित ऊर्जा, उत्पादन व तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीसाठी उत्तम केंद्र बनला असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी सांगितले.

ते जपानच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आले असून टोकियो येथे आयोजित इंडिया-जपान इकॉनॉमिक फोरमच्या परिषदेत हे वक्तव्य केले.

मोदी म्हणाले की, जपानचे तंत्रज्ञान व भारताची प्रतिभा एकत्र आली, तर शतकातील तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व करू. जपान हा तंत्रज्ञानातील महाशक्ती आणि भारत प्रतिभेचा महास्रोत आहे. हे दोन्ही देश कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमिकंडक्टर, क्वांटम संगणक, जैवतंत्रज्ञान आणि अवकाश या क्षेत्रांत परस्परांना अधिक सहकार्य करू शकतात. मेट्रो नेटवर्क असो, उत्पादन, सेमिकंडक्टर्स किंवा स्टार्टअप्स या बाबतीत जपानने भारताला सहकार्य केले आहे. भारत २०३० पर्यंत ५०० गिगावॅट अक्षय ऊर्जा क्षमतेकडे वेगाने वाटचाल करत आहे. २०४७ पर्यंत १०० गिगावॅट अणुऊर्जे चे लक्ष्य आहे.

## शेत जमिनीला तार कुंपनासाठी ९० टक्क्यांपर्यंत अनुदान

**अहिल्यानगर :** शेतातील पिकांचे वन्य प्राण्यांपासून संरक्षण करण्यासाठी तारेचे कुंपण हा उत्तम पर्याय आहे. मात्र त्याचा खर्च अनेक शेतकऱ्यांना परवडत नाही. त्यामुळेच राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी तार कुंपण योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना काटेरी तार आणि लोखंडी खांबांसाठी अनुदान मिळते.

तसेच, एक ते दोन हेक्टर शेतीसाठी ९० टक्के अनुदान, दोन ते तीन हेक्टर शेतीसाठी ६० टक्के अनुदान, तीन ते पाच हेक्टर शेतीसाठी ५० टक्के अनुदान, तर पाच हेक्टरपेक्षा जास्त शेतीसाठी ४० टक्के अनुदान मिळते.

## कृत्रिम फुलांवर बंदी घाला!

**मुंबई :** गणेशोत्सवाच्या काळात बाजारात मोठ्या प्रमाणात कृत्रिम फुले विक्रीसाठी येतात. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत असल्याचं चित्र दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना पत्र लिहलं आहे. भरणे यांनी कृत्रिम फुलांच्या वापरास कायदेशीर प्रतिबंध घालण्याची



मागणी पंकजा मुंडे यांच्याकडे केली आहे.


कृत्रिम फुलांच्या वापरामुळं फुल शेती धोक्यात आली आहे. यामुळं शेतकऱ्यांचे मोठं आर्थिक नुकसान होत आहे. शेतकरी हितास्तव पर्यावरण विभागाकडून कायदेशीर उपाययोजना करण्याची विनंती दत्तात्रय भरणे यांनी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना केली आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर पण त्याचबरोबर नागरिकांच्या आरोग्यावर व पर्यावरणावर प्लास्टिक फुलांमुळे गंभीर परिणाम होत आहे. त्यामुळं कृत्रिम फुलांवर तात्काळ बंदी घालावी असी मागणी केली जात आहे.


**महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी**

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नागरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हूशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नागरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**


## नीरज चोप्राचे झ्युरिक डायमंड लीगमध्ये रौप्यपदक




मुंबई : भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्राने स्वित्झर्लंडच्या झ्युरिकमध्ये पार पडलेल्या डायमंड लीगमध्ये दुसरे स्थान पटकावत रौप्य पदक जिंकले आहे. तर, जर्मनीच्या ज्युलियन वेबरने नीरज चोप्राचा पराभव करत प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्णपदकावर नाव कोरले. तर, पॅरिस ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकूनही पाकिस्तानचा अर्शद नदीम डायमंड लीगच्या अंतिम फेरीत दिसला नाही. नदीमने डायमंड लीग २०२५ च्या कोणत्याही स्पर्धेत भाग घेतला नव्हता, त्यामुळे तो अंतिम फेरीसाठी पात्र ठरू शकला नाही. दरम्यान, सप्टेंबरमध्ये टोकियो येथे होणाऱ्या जागतिक अॅथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये नीरज आणि नदीम यांच्यात लढत होण्याची शक्यता आहे. नीरज चोप्राने पॅरिस डायमंड लीगमध्ये सुवर्णपदकाची कमाई केली होती. पॅरिसमधील स्टेड सेबॅस्टियन शार्लेट स्टेडियममध्ये झालेल्या या स्पर्धेत नीरजनं जर्मनीच्या ज्युलियन वेबरला पछाडत सुवर्ण मिळवलं. वेबरनं ८७.८८ मीटर अंतरावर भाला फेकला होता. पण नीरजनं पहिल्याच प्रयत्नात ८८.१६ मीटर अंतर कापत विजय हा मिळवला. ऑगस्ट मध्ये झालेल्या लोझान डायमंड लिगमध्ये त्याने रौप्य पदक पटकावलं होतं. त्याने ८९.४९ मीटर्स अंतरापर्यंत भाला फेकण्याची कामगिरी केली होती. नीरजने पॅरिस ऑलिंपिकमध्येही भालाफ ेक क्रीडाप्रकारात रौप्यपदक पटकावलं होतं. टोकियो ऑलिम्पिकमध्ये नीरज चोप्राने भालाफेकमध्ये सुवर्ण पदक जिंकून इतिहास रचला होता. पॅरिस ऑलिंपिकच्या फायनल नीरजचा पहिला थ्रो फाऊल झाला होता. पण दुसऱ्या प्रयत्नात त्यानं ८९.४५ मीटरवर भालाफेक केली. नीरजचे पुढचे प्रयत्नही अपयशी ठरले. पण रौप्यपदक मिळवण्यासाठी ही कामगिरी पुरेशी ठरली. दुसरीकडे अर्शद नदीमनं दुसऱ्या प्रयत्नात ९२.९७ मीटरवर भालाफेक करत नवा ऑलिंपिक विक्रम रचला आणि सुवर्णपदकही निश्चित केलं. पाकिस्तानचं हे ऑलिंपिकमधलं पहिलंच वैयक्तिक सुवर्णपदक आहे. ग्रेनडाच्या अँडरसन पीटर्सनं ८८.५४ मीटरवर थ्रो करत कांस्यपदक जिंकलं. स्वतंत्र भारतासाठी सलग दोन ऑलिंपिकमध्ये पदकं जिंकणारा नीरज आजवरचा एकूण तिसरा खेळाडू आणि आजवरचा दुसरा पुरुष आहे.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021